वाचले:-१) मे. अर्बन रिॲलिटी तर्फे भागीदार श्री. पंकज नवलाखा, रा. औदुंबर सोसायटी, फ्लॅट नं. ए १९, पुणे ३७ यांचा महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांचे कार्यालयाकडे केलेला दि. ०२/०७/२०१८ रोजीचा अर्ज.

२) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयाकडील क्र. बीबीएच/मौ.वनपुरी/ग.नं.२२/प्र.क्र.११५, दि. १५/०९/२०२० (या कार्यालयास प्राप्त दिनांक १६/०९/२०२०) रोजीचे पत्र.

३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील महाराष्ट्र अध्यादेश क्र. २ दिनांक.०५/०१/२०१७.

४) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दिनांक - १९ ऑगस्ट २०१७

**जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्र**

**(महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२क)**

**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**
(महसूल शाखा)
क्र. पुरंदर/एनए/एसआर/०१/२०२०
पुणे दि. ०९ /११/२०२०

प्रति,
मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
सयाजीराव गायकवाड, उद्योग भवन औंध पुणे-०७

विषय:- **जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्र**
मौजे वनपुरी, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे येथील जमीन ग.नं २२ पै. मधील ८००००.०० चौ. मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४२ क नुसार जमिनीचे रुपांतरणाबद्दल अकृषिक आकारणी व शासकीय देणी कळविण्याबाबत

संदर्भ:- आपले कार्यालयाकडील क्र. बीबीएच/मौ.वनपुरी/ग.नं.२२/प्र.क्र.११५,
दि.१५/०९ /२०२० (या कार्यालयास प्राप्त दिनांक १६/०९/२०२०)

महोदय,

मौजे वनपुरी, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे येथील जमीन ग.नं २२ पै. मधील रेखांकनात समाविष्ट केलेले ८००००.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८ रेखांकन / बांधकाम परवानगी मिळणेबाबत दिनांक ०२/०७/२०१८ रोजी अर्जदार मे. अर्बन रिॲलिटी तर्फे भागीदार श्री. पंकज नवलाखा, रा. औदुंबर सोसायटी, फ्लॅट नं. ए १९, पुणे ३७ यांनी आपले कार्यालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे.

२. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र.क्र.११५/ टी-१ दिनांक- १९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार आपण आपले कडील पत्र क्र. बीबीएच/मौ.वनपुरी/ ग.नं.२२/ प्र.क्र.११५, दि. १५/०९/२०२० अन्वये सदर जमिनीच्या संदर्भातील भोगवटा/ धारणाधिकार/ अधिभार / अकृषिक



Scanned by CamScanner

आकारणी व इतर शासकीय देणी या मुद्दयांची माहिती मिळणेकामी प्रस्तुतचा प्रस्ताव व त्यालगतची कागदपत्रे या कार्यालयाकडे सादर केलेली आहेत.

३. त्यानुसार महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७/ प्र. क्र.११५/टी-१ दिनांक- १९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. (I) (२) (i) मधील (अ) ते (इ) मध्ये नमुद मुद्यांचे अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

४. मौजे वनपुरी, ता. पुरंदर, जिल्हा पुणे येथील खालील वर्णनाची जमीन जमिनमालक यांचे हक्कनोंदणीस दाखल आहे.

| अक्र | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे/गट/सिटी सर्व्हे नं. |
|---|---|---|---|
| १ | वनपुरी | पुरंदर | २२ |
| अ.क्र | जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं./ गट नं. / सिटी सर्व्हे नं. | प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी) |
| १ | ढवळेश्वर गंगाराम कुंभारकर<br>मे. अर्बन रिॲलिटी तर्फे भागीदार श्री. पंकज नवलाखा | २२ पै. | ८०,०००.०० |
| रेखांकनात समाविष्ट केलेले क्षेत्र | | | ८०,०००.०० |
| वापरात बदलाचे प्रयोजन :- | | | निवासी |

४.१ विषयांकीत जमिन ही **भोगवटादार वर्ग-१** ची आहे.

४.२ उपलब्ध कागदपत्रांवरून सदरची जमीन कुळकायदा संवर्गातील दिसून येत आहे.

४.३ या कार्यालयातील उपलब्ध ॲलिनेशन रजिस्टर मधील नोंदी पहाता सदर जमीन **वतनाची** असलेची दिसून येत नाही.

४.४ सन १९५० पासूनचे ७/१२ उतारे व त्यावरील फेरफार नोंद यावरुन सदरची जमिन खाजगी/राखीव वनसंवर्गात मोडत नाही.

४.५ अकृषिक आकारणी तसेच यथास्थिति नजराणा किंवा अधिमुल्य शासन देय रक्कमा जमा करण्याचे विहित लेखाशिर्ष:-

Land and Revenue

Non Agricultural Assessment

००२९१७४६०१

| अ.क्र. | तपशील | आकारणी |
|---|---|---|
| १ | बिगरशेती आकारणीचे प्रयोजन | निवासी |
| २ | बिगरशेती आकारणीचे निव्वळ क्षेत्र (चौ.मी.) | ८०,०००.०० चौ.मी. |
| ३ | बिनशेती आकारणीचा दर (प्रति चौ.मी.) | ०.०५ पैसे |
| ४ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | ४०००/- |
| ५ | रुपांतरीत कराची आकारणी | २०,०००/- |
| ६ | जिल्हा परिषद कर | २८,०००/- |
| ७ | ग्रामपंचायत कर | ४०००/- |
| ८ | **वसूल करावयाची एकूण रक्कम रुपये** | ५६,०००/- |



Scanned by CamScanner

५. त्यानुसार वरीलप्रमाणे नमुद अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबत अर्जदार यांनी चलन क्र. MH००६२३१७२१२०२०२१M, दिनांक २८/१०/२०२० व डिफेस चलन क्र. ०००२८७१४७२२०२०२१दि. ०२/११/२०२० या कार्यालयास सादर केले आहे.

६. नागरी कमाल जमिन धारणा कायद्यांतर्गत असलेल्या केसेस (यु.एल.सी.), कुलमुख्त्यारपत्र, वनजमीन, मोजणी नकाशा, जागा पाहणी, विद्युतवाहीनी, भुसंपादन, पर्यावरण विभाग ना-हरकत (Environment Clearance), एअर फोर्स, रेडझोन परिक्षेत्र (वर्क्स ऑफ डिफेन्स ॲक्ट) उदा. देहु ॲम्युनेशन डेपो, दिघी मॅगेझिन, उच्च ऊर्जा पदार्थ अनुसंधान प्रयोगशाळा (HEMRL), INS शिवाजी, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA), पर्यावरण संवेदनशिल असलेली गांवे (ESA) इ. तांत्रिक बाबींची खात्री नियोजन प्राधिकारी म्हणुन पुणे महानगर विकास क्षेत्र प्राधिकरण यांनी त्यांचे स्तरावर करूनच रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी देणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे विषयांकीत जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, ती वरील अधिभार रूपांतरण कर, अकृषिक आकारणी तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी याबाबतची वस्तुनिष्ठ माहिती सादर करण्यात येत आहे. तरी विषयांकीत जमिनीवरील रेखांकन/बांधकाम आराखडयांना उपरोक्त नमुद बाबींच्या पडताळणी अंती मंजूरी देण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक- १९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (ii) मध्ये नमुद केलेप्रमाणे आपले स्तरावर विहित मुदतीत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

मा. जिल्हाधिकारी सो.
यांचे मान्यतेने

(डॉ. जयश्री कटारे)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.**

**प्रतः- मे. अर्बन रिॲलिटी तर्फे भागीदार श्री. पंकज नवलाखा, रा. औदुंबर सोसायटी, फ्लॅट नं. ए १९, पुणे ३७**

शासन परिपत्रक दिनांक- १९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे पुणे महानगर विकास क्षेत्र प्राधिकरण यांनी त्यांचे स्तरावर रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी दिलेनंतर **शासनास देय रक्कमा विहित लेखाशिर्षाखाली भरल्या संदर्भातील चलनाची प्रत व रेखांकन/बांधकाम परवानगीची साक्षांकीत प्रत या कार्यालयाकडे सादर करावी.** जेणेकरून प्रस्तुत जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ मध्ये जमिन अकृषिक झाल्याची नोंद घेणेकामी पुढील आवश्यक ती कार्यवाही करता येईल.

(डॉ. जयश्री कटारे)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.**



Scanned by CamScanner